# अर्थशास्त्र विभाग अहवाल

# Year 2017-18

लोक महाविद्‌यालयाच्या स्थापने पासूनच म्हणजेच 1987 पासून अर्थशास्त्र विभागाची स्थापना झाली. दैनंदिन जिवनातील आर्थिकव्यवहारांचे ज्ञान, भारतातील अर्थव्यवस्था अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने व त्यावरील उपाय शोधुन काढण्याकरिता अर्थशास्त्र हा विषय विद्‌यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे

**अर्थशास्त्राचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे, त्यांच्या मनात अर्थशास्त्राविशयी जिज्ञासा निर्माण व्हावी या उद्देशाने बी.ए. भाग १,२,३ आणि एम.ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले चर्चासत्राला विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.**

**बी.ए. भाग १,२,३ तसेच एम.ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांना असाईनमेंट देण्यात आले. त्यावर विद्यार्थ्यांचे सेमिनार घेण्यात आले. त्यामुळे दिलेल्या विशयाबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती प्राप्त झाली. अशाप्रकारे अर्थशास्त्राचा विद्यार्थी अधिक डोळस आणि चिकित्सक होण्याच्या उद्देशाने मंडळाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.** बी.ए. भाग १च्या विध्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतर जुलै महिन्यात एक आठवडा अर्थशास्त्राची तोंडओळख व्हावी म्हणून, अर्थशास्त्र परिचय अभ्यासक्रम शिकविण्यात आला ऑगस्ट महिन्यामध्ये कमकुवत असणारे विद्यार्थी व हुशार विद्यार्थी शोधण्यासाठी त्यांची घटक चाचणी घेण्यात आली. जे विद्यार्थी अभ्यासक्रमात मागे हते त्यांचासाठी RemedialCoaching Class घेण्यात आला. हुशारविद्‌यार्थ्यांना ग्रंथालयातील विविध पुस्तके व websites सुचविण्यात आल्या अर्थशास्त्राच्या सर्व विधार्थांची सभा घेऊन अर्थशास्त्र अभ्यास मंडळ गठित करण्यात आले. प्रथम सत्रात दोन यूनिट टेस्ट व्द्वितीय सत्रात एक यूनिट टेस्ट घेण्यात आली. अभ्यासमंडळाद्‌वारे विविध कार्यक्रम घेण्यात आले.विद्‌यार्थ्यांच्या अभ्यासातील प्रगति व मूल्यमापन करण्याकरिता घटक चाचण्या व सराव परीक्षा घेण्यात आल्या.

**लोक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची बँकेला भेटः–**

**लोक महाविद्यालयाच्या बि.ए. व एम.ए. च्या अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेला भेट दिली.स्थानिक बॅचलर रोड, पावडे नर्सिंग होम जवळ स्टेट बँक ऑफ इंडियाची एस.बी.आय' इन टच' ही शाखा नव्यानेच स्थापन झाली आहे. या शाखेमध्ये संपूर्ण व्यवहार कॅशलेस पध्दतीने होतात. नविन खाते काढणे खाते इंटरनेट बँकींग मध्ये बदलविणे क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, ए.टी. एम. आदी सुविधा खात्याला सुरु करणे ही सर्व कामे टच स्क्रीन अप्लीकेशन व्दारे पुर्ण केली जातात. आजच्या कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेला पुरक कार्ये हया अधिकोषाकडून केली जातात. हया नविन कार्यप्रणालीचा अभ्यास करण्याच्या दृश्टीने या शाखेला अर्थशास्त्राचे विद्यार्थी, प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे या सर्वांनी भेट दिली.**

**एस.बी.आय'इन टच' या शाखेतील कर्मचाऱ्यांनी बँके संबंधी संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगितली आणि प्रात्यक्षिकही करुन दाखविले महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपले खाते सुध्दा स्वत: उघडलेत क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, पैशाचे स्थानांतरण, तसेच सर्व व्यवहार कॅशलेस कसे होतील याचीही माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्षपणे प्राप्त झाली. एकूनच डिजिटल इंडिया ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या लक्षात आली. आणि अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास क्रमातील एक भाग म्हणून बँकेला दिलेली भेट ही फायदयाची ठरली.**

**या कार्यात 'एस.बी.आय' इन टच' शाखेतील शिल्पा मॅडम व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन प्राप्त झाले. या भेटीचे वेळी लोक महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. सौ. पुष्पा तायडे मॅडम यांचे ही मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली तसेच प्रा. विकास नाखले, प्रा. शुभांगी राऊत, प्रा. सुजाता जोशी, प्रा. मिनाक्षी वरघने यांच**

सहकार्य लाभल. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विशाल खोंडे, हर्षल करडे, तुषार पुयाड आणि इतरही विद्यार्थ्यांच सहकार्य प्राप्त झाल.

**राज्यस्तरीय सेमीनार**:- दि.११/०२/२०१७ ला महाविद्यालयात अर्थशास्त्र व वाणिज्य विभागा तर्फे 'नोटबंदीचे परीणाम' यावर राज्यस्तरीय सेमीनार आयोजीत करण्यात आला. उद्घाटनीय कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मा. डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरु संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व प्रसिध्द अर्थतज्ञ डॉ श्रीनिवास खांदेवाले , अध्यक्ष स्थानी लो. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन कोटेवार होते. या चर्चासत्रासाठी ५२ शोध निबंध आले. स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमा साठी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी नोटबंदीचे परीणाम यावर शोधनिबंध सादर केले. व हा सेमीनार सफल करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पुष्पा तायडे, प्रा. डॉ. राजीव जाधव, प्रा. अनिल सुरकार, प्रा. डॉ. अविनाश साहुरकर अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी , वाणिज्य मंडळाचे विद्यार्थी व महाविद्यालयाचा प्राध्यापक व शिक्षकेत्तर वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

प्राचार्य डॉ.सौ.पुष्पा तायडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोक महाविद्यालय.वर्धा